# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 12/12/2019 (गुरूवार)
# (सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

1) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 12 किमी अंतरावर कारगाव रेल्वे क्रासिंग रोड येथे दिनांक 10/12/2019 चे 23.10 वा. ते 23.45 वा. दरम्यान एमच–49/एटी–9334 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– क्र. 1) प्रकाश जुलूश वर्मा, वय 27 वर्ष, रा. गल्ली क्र. 39, संतोष नगर झोपडपट्टी, कळमना मार्केट, नागपूर व 2) समीर शेख करीम शेख (मालक), वय 33 वर्ष, प्लाट नं 33 राजा अम्मा मस्जिद जवळ अयोध्या नगर, नागपूर यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 20,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण कि. 30,20,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार रमेश भोयर, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक रवि फरकाडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 18 किमी अंतरावर मौजा खात शिवार येथे दिनांक 11/12/2019 चे 09.30 वा. ते 10.00 वा. दरम्यान एमच–49/एटी–2729 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– क्र. 1) सुरेश महादेव भोडेकर, वय 31 वर्ष, रा. कामठी याने 2) रामकृष्णा शेषराव केने (मालक), रा. नागपूर याच्या सांगण्यावरून सुर नदीच्या पात्रातुन त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 10,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना तो मिळुन आले. वाहनासह एकुण 15,10,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक नरेश श्रावणकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

# अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावरील खापा ते सावनेर रोड आरामशीन जवळ येथे दिनांक 11/12/2019 चे 11:30 वा. ते 12:00 वा. दरम्यान अज्ञात जड वाहनाचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– 40/बीव्ही– 3096 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार नामे– 1) केशव धनराज गोड्डे, वय 55 वर्ष व 2) शुभम केशव गोड्डे, वय 23 वर्ष, दोन्ही रा. खापा यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. झांबरे हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील मधुबन हॉटेल समोर एन एच 6 रोड येथे दिनांक 11/12/2019 चे 05:00 वा. दरम्यान फिर्यादींचा मोठा भाऊ नामे– अशोक माधवराव बाळबुधे, वय 65 वर्ष, रा. शारदा चौक, मौदा हे सकाळी नेहमी प्रमाणे फिरायला गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पायदळ जाणारे अशोक बाळबुधे यांना धडक दिल्याने गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 184, 117 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुथे हे करीत आहे.

2) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावरील मौजा एन एच 44 रोड कट्टा देवलापार पेट्रालपंप समोर येथे दिनांक 07/12/2019 चे 06:00 वा. दरम्यान अज्ञात ट्रक चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पेट्रोलपंप समोरून हातात मोटरसायकल घेवून बैलजोडीससह जाणारे देवराव ठाकरे, वय 40 वर्ष, रा. गवना यांना धडक दिली. या अपघातात देवराव हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना प्रथम ग्रामीण रूग्णालय देवलापार व नंतर मेयो हॉस्पीटल नागपूर येथे दिनांक 07/12/2019 चे 09.15 वा. त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. बोरकुटे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर